हिंदु संघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत

# हिंदु जनजागृति समिति

नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

भ्रमणध्वनी
९३२६१०३२७८
ई-मेल
contact@HinduJagruti.org
संकेतस्थळ
www.HinduJagruti.org

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

।। जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् ।। दिनांक : ८.३.२०१५

कृपया प्रसिद्धीसाठी

## 'असली' पंडित चंद्रशेखर आझाद आणि 'नकली' पंडित जवाहरलाल नेहरू !

## देशभक्त चंद्रशेखर आझाद यांचे मारेकरी जवाहरलाल नेहरू असल्याच्या आरोपांची चौकशी करा ! - हिंदु जनजागृती समिती

मुंबई - थोर क्रांतीकारक चंद्रशेखर आझाद यांचे पुतणे सुजीत आझाद यांनी नुकतेच जवाहरलाल नेहरू यांनीच इंग्रजांना चंद्रशेखर आझाद यांची गुप्त माहिती पुरवली आणि त्या माहितीच्या आधारे इंग्रजांनी चंद्रशेखर आझाद यांना घेरले. या वेळी घायाळ झालेले आझाद यांनी इंग्रजांना शरण जाण्यापेक्षा स्वतःला संपवले आणि एका महान क्रांतीकारकाचा अंत झाला, असा खळबळजनक आरोप केला आहे. तसेच त्यांनी नेहरूंना देण्यात आलेला 'भारतरत्न' परत घेण्याची मागणी केली आहे. गांधींच्या मृत्यूनंतर ज्याप्रमाणे 'कपूर आयोग' नेमला गेला, तसा आयोग नेमून या आरोपांची त्वरित चौकशी करून सरकारने जनतेपुढे सत्य मांडावे.

जवाहरलाल नेहरू यांना क्रांतीकारकांप्रती इतका द्वेष होता की, आझाद आणि भगतसिंग आदी क्रांतीकारकांना ते 'फॅसिस्ट' म्हणत. याच विचारसरणीमुळे काँग्रेसशासनाच्या कालावधीत 'एन्.सी.ई.आर्.टी.'च्या पुस्तकातून चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु आदी थोर बलिदानी क्रांतीकारकांना 'आतंकवादी' असल्याचे शिकवले जात होते. मागील निवडणुकीत जनतेने सत्ताच्युत केल्यानंतर आज काँग्रेसला देशभक्त क्रांतीकारकांची उपरती झाली आहे. मात्र याच नेहरूंचे पणतु आणि काँग्रेसचे राजपुत्र राहुल गांधी 'जेएनयु' विद्यापीठातील देशविरोधी घोषणा देणाऱ्या देशद्रोही युवकांसोबत जाऊन पाठींबा घोषित करत आहेत. काँग्रेसच्या 'असली' स्वरूपाला आता संपूर्ण भारतातील जनतेने ओळखले आहे.

सुजीत आझाद यांच्या म्हणण्यानुसार वर्ष १९३१ या वर्षी चंद्रशेखर आझाद यांनी भगतसिंग यांची फाशी रहित करण्यासाठी नेहरूंसोबत गुप्त बैठकीसाठी नेहरूंच्या 'आनंद भवना'त आले होते. त्या वेळी त्यांनी भगतसिंग यांच्या सुटकेसाठी 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लीकन असोसिएशन'चा मोठा फंड देखील दिला. ती बैठक झाल्यावर परतत असतांना 'आल्फ्रेड पार्क' येथे इंग्रजांनी घेरले आणि गोळीबार केला, त्या वेळी इंग्रजांना शरण जाण्यापेक्षा त्यांनी स्वतःला संपवले आणि एका महान क्रांतीकारकाचा अंत झाला. चंद्रशेखर आझाद यांच्या मृत्यूविषयी चौकशी समिती नेमावी आणि सत्य जनतेसमोर आणावे, अशी हिंदु जनजागृती समितीची मागणी आहे.

ब्रिटीशांच्या आशीर्वादाने पंचतारांकीत भवनात कैद भोगणारे आणि क्रांतीकारकांच्या हत्येला जबाबदार असणारे 'नकली' पंडीत नेहरू यांची तुलना अंदमानच्या कोठडीत काळ्या पाण्याची शिक्षा भोगणाऱ्या आणि कोलू फिरवून देशभक्तीसाठी रक्त गाळणाऱ्या स्वा. सावरकरांशी कधीच होऊ शकणार नाही. हे काँग्रेसी नेत्यांनी यापुढील 'ट्वीट' करतांना लक्षात ठेवावे.

आपला विश्वासू,

श्री. रमेश शिंदे,
राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदू जनजागृती समिती (संपर्क क्रमांक : ९९८७९६६६६६)